डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र

सोनापूर, गडचिरोली-४४२ ६०५ (महाराष्ट्र)

डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

फोन /फॅक्स : (०७१३२) २२३०१७
ई. मेल : kvksonapur@gmail.com
kvksonapur@pdkv.ac.in

जा. क्र/व.शा.प्र./कृविके/गड/ ९९८ /२०२६ दिनांक : ३०.१०.२०२६

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन माहीती यंत्रणा (ARIS Cell),
डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला

विषय : विद्यापीठ संकेतस्थळावर ‘ मासेमारी तलाव भाडेतत्वावर’ देण्याबाबत जाहीर लिलाव व सूचना प्रकाशित करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथील प्रक्षेत्रावरील तलावाचे मासेमारीकरीता सन २०२६ ते २०२७ या एका वर्षाच्या कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्याबाबत जाहीर लिलाव व सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करण्यासाठी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये पाठविण्यात येत आहे. सोबत जोडलेले प्रपत्र दिनांक ३०.१०.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात यावे ही विनंती.

करीता आपल्या माहीतीस व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सोबत : प्रपत्र १

वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

लिलावाच्या अटी व नियम

दिनांक ०६ / ११ / २०२६ रोजी रोज शुक्रवार सकाळी ११.०० वाजता कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथे प्रक्षेत्रावरील तलावाचे सन २०२६-२७ या कालावधीकरीता मासेमारी हक्क देण्यासाठी जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. लिलावाटया अटी व नियम खालीलप्रमाणे आहे.

१) जाहीर लिलाव ठरलेल्या तारखेस, ठिकाणी व वेळेवर करण्यात येईल. एकच व्यक्तीहजर असल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.

२) लिलावात बोली बोलना बोलणा-यास रु. ५०००/- अग्रिम रक्कम जमा करावी लागेल. अन्यथा बोली बोलता येणार नाही.

३) अग्रिम रक्कम (५०००/-) ज्यांनी लिलाव घेतला असेल त्याच्या रक्कमेत वळती करण्यात येईल व इतरांची अग्रिम रक्कम त्याच वेळी परत करण्यात येईल.

४) लिलावाची बोली संपताच लिलावाची संपूर्ण रक्कम त्याच वेळी भरणा करावी लागेल अन्यथा अग्रिम रक्कम जप्त करण्यात येईल.

५) वरील अटीचे उल्लंघन झाल्यास लिलाव समिती एक तर्फे निर्णय घेऊन लिलावातून मुक्त होईल.

६) दिनांक ३० /०६ /२०२७ पर्यत अथवा पाणी संपण्याचा कालावधी जो आधी असेल तो पर्यतच मासेमारी हक्क देण्यात येतील तद्नंतर लिलाव घेणा-याचा तलावावर कोणताही हक्क राहणार नाही.

७) सदर तलावाची योग्य किंमत न आल्यास लिलाव रद्द करण्याचा वा पुढे ढकलण्याचा अधिकारी लिलाव समितीस राहील.

८) सदर तलाव संपूर्णत: नैसर्गिक पाण्यावर अवलंबून असून जाहीर लिलावाच्या दिवशी सदर तलाव पूर्ण भरलेला असून कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर गडचिरोलीच्या प्रक्षेत्राच्या पिकासाठी संरक्षित ओलीत करण्याकरीता तलावाचे पाणी घेण्याचे अधिकार कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली याना राहील व तसा करारनामा लिलाव घेणा-यास करून द्यावा लागेल याची कृपया नोंद घ्यावी.

९) तलावाचे संपूर्ण संरक्षण तलाव घेणा-यास स्वत: करावे लागेल व आसपासच्या अवागमनास अडथळा होणार नाही हयाची दक्षता घ्यावी.

१०) कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली यांच्याकडून मत्स्यबीज संचयन करण्यात येणार नाही हयाची नोंद घ्यावी. .

११) नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत राहील.

१२) लिलावाचे स्थळ : कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली

वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली